|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

KAVAYITRI BAHINABAI CHAUDHARI NORTH MAHARSHTRA UNIVERSITY, JALGAON

( पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव Formerly North Maharashtra University, Jalgaon)

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4 th Cycle)

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/ ५४६८ /२०२३ दि. ४.१२.२०२३

**प्रति,**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व
महाविद्यालयांचे मा.प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक

**विषय:- विद्यापीठाद्वारा घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे कामकाज करणेबाबत.**

**संदर्भ:-** विद्यापीठाचे पत्र क्र. कबचौउमवि//७-अ/४६३०/२०२३, दिनांक ०७.११.२०२३.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन व संदर्भीय पत्रान्वये आपणास परीक्षा संबंधित कामकाजाबाबत सुचित करण्यात आलेले आहे. तरी याबाबत आपणास पुनश्च सुचित करण्यात येते की, विद्यापीठाच्या परीक्षेचे कामकाज करणे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना बंधनकारक आहे. विद्यापीठाच्या परीक्षेच्या वेळापत्रकानुसार परीक्षा सुरळीत सुरु असून झालेल्या परीक्षेच्या विषयांच्या उत्तरपत्रिका तपासणीचे कामकाज ऑनलाईन पध्दतीने सुरु केलेले आहे. मा. कुलगुरु महोदय, मा. प्र. कुलगुरु महोदय, मा. कुलसचिव व मा. संचालक यांनी धुळे, जळगाव व नंदुरबार जिल्हयातील महाविद्यालयांना भेटी देवून त्यात मा. प्राचार्य व शिक्षकांना उत्तरपत्रिका तपासणीसाठी आवाहन केलेले आहे. तरी या आवाहनास प्रतिसाद देवून काही प्राचार्य व शिक्षंकानी याबाबत कामकाज सुरु केलेले आहे.

तथापी, काही महाविद्यालयांनी अद्यापपावेतो कामकाज सुरु केलेले नसल्यामुळे सर्वांना पुनश्च विनंती करितो की, दिनांक १५.१२.२०२३ पर्यंत ऑनलाईन उत्तरपत्रिका उपलब्ध होतील त्या उत्तरपत्रिका तपासणीचे कामकाज पूर्ण करावे,जेणेकरुन सर्व निकाल वेळेत लावणे सोईचे होईल.

विद्यार्थी हित हे सर्वतोपरी ध्येय ठेवून आपण सर्वांच्या सहकार्याने परीक्षेचे काम विहित कालावधीत सुरळितपणे पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे

आपला विश्वासू,

**( प्रा. योगेश ना. पाटील )**
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**